# धनगरी लोकसाहित्य - एक संक्षिप्त दृष्टिक्षेप

संशोधक
श्री दत्ता बाबुराव राजे

**प्रस्तावना :-**

भारतीय परंपरा आणि संस्कृती या दृष्टीने लोकसाहित्याचे स्थान उच्च आहे. लोकसाहित्य भारताच्या आदिसंतानाचे अस्सल वाड्मय भांडार आहे हे आदिसंतान म्हणजे आदिवासी, भिल्ल, कोकरु, बंजारा, माडिया, गोंड, नागा, धनगड, वारली इत्यादी हेच लोकसाहित्याचे खरे वारसदार होत. लोकगीते हि शक्यतो लिखित स्वरुपात आढळून येत नाहीत. त्यामुळे मौखिक परंपरेनेच लोकगीते पिढ्यानपिढ्या एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात

लोकजीवनाच्या आविष्काराचा विचार करता धनगरी लोकसाहित्याचे वेगळेपण त्यांच्या संस्कृतीत दडलेले आढळते धनगर लोकांची संस्कृती आचारविचार, रूढी, परंपरा, विधी, देव-देवता, समजुती, म्हणी, लोककथा, लोककथागीते अशा वैविध्यपूर्ण आविष्कारातून व्यक्त होते

**व्याख्या :-**

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या अभ्यासानुसार विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिनगारलेले(शृंगारलेले) व शिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचिले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या उत्तेजित करणारे भावगीत अशी लोकगीताची व्याख्या केली आहे. धनगर लोकगीतांची परंपरा समाज अस्तित्वात येण्याअगोदर सामूहिक जीवन सुरू झाले तेव्हापासून असल्याचा उल्लेख आढळतो. प्राचीन काळी लिपिबद्द लेखन कला नसल्यामुळे लोकगीते बोली भाषेत समाविष्ट होती.

लोकगीतांचे स्वरूप निश्चित करण्यासाठी त्यांच्या बहुविध उद्दिष्टांचा विचार करणे आवश्यक ठरते. लोकगीत हे ललित प्रकृतीचे नसून आत्मनिष्ठ असते धार्मिक विधी, मनोरंजन, श्रमपरिहार, उपासना, मंत्रउच्चार, अशा विविध अंगाने लोकगीते व्यक्त होतात.

लोकगीतावर शब्दस्वरांचे अधिपत्य असून गेयता असते. सामूहिकता हा लोकगीताचा विशेष आहे. लोकगीताची सार्वत्रिकता व सार्वकालिकता महत्त्वाचे आहे. लोकगीत, लोकसंगीत व लोकनृत्य यांचा परस्परसंबंध असतो लोकगीतात स्त्रीगीते विपुल प्रमाणात आढळून येतात लोकगीते प्रवाही असतात. लोकगीताचे विधीशी नाते असते. समूह जाती प्रदेश यात बदल संभवला तरी लोकगीताचा भाव हा मात्र कायम राहतो. लोकगीतास काळाचे बंधन असते. कर्ता सामूहिक असून अनामिक असतो लोकगीतात धृपद महत्त्वाचे असून धृपदाच्या विशिष्ट लयीमुळे लोकगीते अधिक उठावदार होतात.

लोकगीतातील संकेत प्रचलित साहित्यातील संकेत यापेक्षा वेगळे असतात. धनगरी लोकगीतात वर्णनपर व आशयात्मक संकेत भरपूर आढळतात धर्माचरण हे धनगरी जीवन पद्धतीतील महत्त्वाचे अंग आहे गीतांच्या मौखिक परंपरेत धनगरी लोकगीते व लोककथागीते अग्रक्रमाने येतात.

धनगरी लोकगीतेही स्त्री-पुरुषांची श्रमगीते, विधीगीते व सण-उत्सव गीते यात विभागली गेली आहेत. या लोकगीतांचे विशेष हे की विधिप्रसंगी, सण-उत्सव प्रसंगी स्त्री-पुरुष ही गीते म्हणतात. या गीतांमधून पौराणिक संदर्भ व्यक्त होतात. लौकिक जीवन जगण्यासाठी देवदेवतांचे आदर्श जपले जातात.

**लोककथागीते :-**

लोकगीताचे कथात्म रूप म्हणजे लोककथागीत. लोककथागीता बाबत पोवाडा, लोकगाथा असे शब्द प्रचलित आहेत. लोकसमूहात मौखिक रूपाने प्रचलित असलेल्या वर्णनात्मक किंवा निवेदनात्मक गीताला लोककथागीत म्हणतात. समाजातील लोकप्रिय आख्यान प्रभावी आणि प्रत्ययकारी स्वरूपात तसेच स्फूर्तिदायक व उत्तेजक स्वरूपात मांडले जाते. लोककथागीतात निर्मात्याच्या व्यक्तिगततेचा

अभाव असून ते सामूहिक नृत्याशी संबंधित असते मौखिक परंपरा हे प्रधान तत्व असून गायक वाङ्मयीन प्रभावापासून अलिप्त असतात. लोककथागीतास कित्येक शतकांची परंपरा असली तरी मौखिक परंपरेमुळे त्यात नित्यनूतनता येते. लोककथागीत अलंकृत असून चरणांची पुनरावृत्ती हे त्याचे विशेष आहे.

**स्वरूप :-**

लोकगीताचे स्वरूप कोणत्याही व्यक्तीने निश्चित केलेले नसून ते स्वयंभू व स्वयंसिद्ध असते कथागीताची सुरुवात व शेवट संथपणाने होतो लोककथागीतात पुनरुक्ती महत्वाची असून प्रभावी व उगवते नियोजन असते. तसेच आशयात्मकता, कारुण्यपूर्णता, व व्यक्तित्व शून्यता असते. कडव्यांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असून दुसरे व चौथे चरण परस्पर संबंध युक्त असते

**लोककथागीतांचा विकासक्रम :-**

लोककथागीतांचा विकासक्रम पाहता असे लक्षात येते की, वेदपूर्व काळापासून अर्वाचीन काळाकडे जाताना त्याचे स्वरूपही बदलत गेले.

आदिजीवनात अंतरीक भावना व्यक्त करण्यासाठी जरी नृत्याचे माध्यम स्वीकारले असले तरी पुढे त्याला गीताची साथ मिळवून नृत्य बोलके बनले त्याहीपुढे जाऊन नृत्यातील गीतात कथा, आत्मकथा येऊन लोक अविष्काराचे एक रेखीव माध्यम प्राप्त झाले तेच लोककथागीत.

**लोककथागीताची लक्षणे :-**

लोककथागीताचे ठरीव रचनातंत्र असते. कथावस्तू लोकजीवनात प्रचलित असलेली असते. कल्पना-संबंध लोक परिचयाचे असतात. भाषा लोकभाषा असते. यात परस्पर विरोधी पात्रांच्या आयोजन केले जाते, पुनरुक्तीला प्राधान्य दिले जाते. निवेदन व गीत यांचा प्रयोगात्मक मिलाप असतो नृत्य, नाट्य, संगीत, अभिनयाद्वारे मनोरंजन व उद्बोधन केले जाते.

**वर्गीकरण :-**

गुमर आणि किटरेज यांनी लोकगीताचे वर्गीकरण करताना प्राचीन लोककथागीते, कौटुंबिक लोककथागीते, पौराणिक लोककथागीते, अलौकिक लोककथागीते, सीमांत लोककथागीते व आरण्यक लोककथागीते असे वर्गीकरण लोकसाहित्याच्या आधारे केले आहे.लोककथागीतांचा उगम ग्रीस देशात झाल्याचे मानण्यात येते. या कथागीतात कौटुंबिक नातेसंबंध थोरव्यक्तींची चरित्रे, पौराणिक कथा तसेच पृथ्वी, आकाश, नक्षत्र, ऋतू या संदर्भातील कथा गुंफलेल्या असतात. त्यामुळेच लोक जीवनात ही कथागीते श्रद्धेय ठरली आहेत.

दैनंदिन जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जनमानसांतील श्रद्धा, नीतीमुळे इत्यादीचा अविष्कार यांच्या अभ्यासाअंती डॉ. प्रभाकर मांडे लोकगीतात शौर्य आत्मकथागीते, ओवी, व्याख्याने गद्य-पद्य मिश्रित कथा, भक्तांची लोकगीते, आदि प्रकारांची भर घालतात.

लोकसाहित्याचे अभ्यासक किरटेज, लोकगीतांचे अभिव्यक्ती गायक या निकषांच्या आधारे लोकगायकांची कथागीते व पारंपारिक लोककथागीते असे वर्गीकरण करतात.

पारंपारिक लोककथागीते प्रकारात भक्तांची लोककथागीते यांना धनगरी संस्कृतीत अधिक महत्त्व आहे.

**परंपरा :-**

वेद-पुराणे, ब्राह्मणग्रंथ, महाकाव्य यांच्यामार्फत लोकगीतात दीर्घ परंपरा असल्याचे सिद्ध होते. शुभप्रसंगी गायली जाणारी गीते, पितर गण किंवा परलोक या प्रकारच्या विषयांशी संलग्न आणि मौखिक परंपरा यावर आधारीत गीत या अर्थाने गाथा हा शब्द छंद प्रकारासाठी ही वापरला जाऊ लागला. वैदिक कालखंडात वीरगीते, व्याख्याने, दैवतकथा, पुराणकथा, इत्यादींना महत्त्व असल्याचे आढळून येते. मौखिक लोककथागीते अस्तित्वात असल्याकारणाने ती गाणाऱ्यांचीही परंपरा निर्माण झाली. यात प्रामुख्याने सूत, मागद, बंदी, कुशीलव, वैतालिक, भाट यांचा समावेश होता.

महाराष्ट्रात परंपरेने लोककथागीते गाणाऱ्या भक्तांचे काही वर्ग आहेत. डॉ. रा. ची. ढेरे यांनी लोकसंस्कृतीचे उपासक या ग्रंथात उल्लेख केल्याप्रमाणे पोतराज (लक्ष्मीबाई), वासुदेव (कृष्ण), गोंधळ (अंबाबाई), भराडी (भैरव), जोगती (देवी), वाघे (खंडोबा), धनगर (बिरोबा) असे भक्तांचे निरनिराळे वर्ग आढळतात. समाजात भगत हे देवाचे रूप मानले जातात. व हे भगत उपास्य देवतांची कथागीते पौराणिक गीते, विधी प्रसंगी गीते गातात. देवदेवतांचे भगत देवाच्या नावावर भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात.

व्हईक हा विधी धनगर समाजामध्ये अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. याप्रसंगी ओवी, वान, सुंबरान गायले जाते सुंबरान म्हणजे धनगरांची मौखिक महाकाव्य होत एका विशिष्ट लयीत आणि सुरात चाललेले हे कथागायन नाट्यपूर्ण सादरीकरणामुळे वेधक बनते. सुंबरानाच्या सादरीकरणात गायन-कथन आणि संवादाची योजना करून सुरेख नाट्यीकरण केले जाते. धनगरांची कथागीते दंतकथा, दैवतकथा आणि अद्भुतकथा या लक्षणांनी युक्त असतात कथा गायन चालू असताना अधूनमधून निरूपण केले जाते धृवपदाची एक संथ लय या लईत चालू असलेले कथागायन मधूनच गायन खंडित करून करण्यात येणारे कथाप्रसंगाचे नाट्यीकरण यांचे एकत्रित संश्लिष्ट स्वरूप म्हणजे सुंबरान बिरोबाच्या उपासना विधीत दीर्घकथागीता सोबत एखाद्या प्रसंगावर आधारित आवहान ही म्हणतात. वानाची भाषा गद्य-पद्य मिश्रित स्वरूपाचे असते. यमक-अनुप्रासांनीयुक्त वानातील लयबद्ध कथनाला नृत्याची जोड दिली जाते. वान म्हणताना निरूपण नसते किंवा संवादाची योजनाही नसते. वानाचे कथा गायनाचा अशा रीतीने केले जाते की ते नाट्यपूर्ण व्हावे.

**समारोप :-**

एका प्रभावी संवाद माध्यम म्हणून समाजात भक्तीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी आणि उद्बोधनासाठी लोककथागीते, लोकगीते हे प्रभावी माध्यम आहे. गेल्या काही वर्षांपासून भारतीय समाजाला आपल्या संपन्न सांस्कृतिक वारसाचे भान आले असून परंपरेने चालत आलेल्या या कलाविष्काराकडे समाज जाणिवेने पाहू लागला आहे. राष्ट्रीय पातळीवर कलाविष्काराला मान्यता मिळाली असून पारंपरिक कलाविष्कार अभीजनांसमोर मांडण्याची संधी सातत्याने मिळाली, तसेच पारंपारिक कलावंत अभिजनांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या सादरीकरणाची लक्षणीय बदल होऊ लागले आहेत.

**सारांश :-**

लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा अविष्कार होत असतो. लोकजीवन आणि लोकसाहित्य यांचा अन्योन्य संबंध आहे. लोकजीवनाच्या आविष्काराचा विचार करता धनगरी लोकसाहित्याचे वेगळेपण त्यांच्या संस्कृतीत दडलेले आहे धनगरी लोकसाहित्यात प्रामुख्याने लोककथा, धनगरी ओवी, लोककथागीते, वान, सुंबरान, व्हईक अशा विविध अंगाने लोकसाहित्य व्यक्त होते. धनगरी समाज अडाणी, अशिक्षित असला तरी पारंपारिक जीवन जगून संस्कृती संवर्धनाचे कार्य करताना आढळतो.

**संदर्भ सूची:-**

१] लोककथा – डॉ. उषाताई शिंदे
२] स्त्रियांचे खेळ व गाणी :- डॉ. सरोजिनी बाबर
३] लोकसाहित्याचे स्वरूप :- डॉ. प्रभाकर मांडे
४] लोकसंस्कृतीचे उपासक :- डॉ. रा. चिं. ढेरे
५] लोककथागीत – प्रा. शिवहार विभूते

# शैक्षणिक मूल्यमापन या विषयासाठी ज्ञानरचना आधारित अध्ययन अध्यापन कार्यनितीचे विकसन - एक अभ्यास

अश्विनी भांडवले
( संशोधक विद्यार्थी

## १ प्रास्ताविक :-

आजचे युग हे स्पर्धेचे गतिमान युग असून ज्ञानाचा प्रस्फोट व माहिती तंत्रज्ञान हे शिक्षण क्षेत्रातील दोन लक्षणीय बदल आहेत. अशा या गतिमान युगात शिक्षण क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. शिक्षण प्रक्रियेतील केंद्रबिंदू असणारा विद्यार्थी या स्पर्धेत टिकणे अपरिहार्य झाले आहे. एकविसाव्या शतकात शिकण्यात शिकविण्यापेक्षा अधिक महत्व आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पूर्णपणे विद्यार्थी केंद्रित झालेली आहे. विद्यार्थी हा केवळ स्विकारकर्ता आहे ही भूमिका बदलल्याशिवाय अध्ययन हे विद्यार्थ्यास आनंददायी ठरणार नाही. कोणत्याही दडपणाशिवाय विद्यार्थी अध्ययन करतील हा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयाचा (२००५ मुख्य विषय विचारात घेण्यासारखा आहे.

आज उदयास आलेल्या प्रत्येक ज्ञानशाखा या तत्वज्ञानाचा भाग होत्या .जीवनातील सर्व अंगांचे मूळ तत्वज्ञानात सापडते. ज्ञानरचनावादास ज्ञानमींमासा करण्याची पध्दती संबोधली जाते. ज्ञानरचनावादाचे मूळ वेदकालीन कालखंड , सांख्यदर्शन , रामायण , महाभारत , यासारख्या महाकाव्यात बौध्दकालीन कालखंडात पडलेले दिसून येते.

स्वीस मानसशास्त्रज्ञ जीन पियाजे व रशियन मानसशास्त्रज्ञ लेव वायगॉटस्की यांच्या सिध्दांतावर आधारित ज्ञानरचनावादाचा उगम झाला. याबाबत अधिक भर ग्लेसरफोल्ड ने टाकली . **मी सांगेन तेच आणि तेवढेच ज्ञान** ही एकाधिकारशाही अध्यापन पध्दत बदलण्यासाठी पर्याय म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००५ मध्ये ज्ञानरचनावाद पुरस्कृत केला आहे. विसाव्या शतकात आलेल्या नवीन शैक्षणिक नवीन शैक्षणिक प्रवाहांमध्ये शिक्षण तज्ञ आणि कार्यवादाचे जनक जॉन डयुई संबंध ज्ञानरचनावादाशी जोडला जातो.

शिक्षणात उद्दिष्टे महत्वाचे असते. तर प्रत्येक व्यक्ती त्याच्या अनुभवानुसार अर्थ लावतो. दैनदिन जीवन जगत असताना व्यक्ती अनेक घटना , गोष्टी , व्यक्ती याबाबत आपले मत सहज व्यक्त करते. एखादया घटनेबद्दल अभिप्राय देते. मापनात आपल्याला संख्यात्मक वैशिष्टये मिळते. या संख्या निर्जीव असतात. या निर्जीव संख्यांना अर्थ प्राप्त करून देण्याचे काम मूल्यमपनामुळे शिक्षक करू शकतात.

## १.२ मूल्यमापन

विद्यार्थ्याच्या बौध्दिक विकासाबरोबर त्याच्या ठिकाणी विविध गुणांचा विकास व्हावा अशी अपेक्षा असते. मुलांमध्ये जो बदल आपण अपेक्षितो त्यालाच शैक्षणिक उद्दिष्ट म्हणतात. ही शैक्षणिक उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली हे ठरविण्यासाठी योजलेली सूत्रबध्द पध्दती म्हणजे मूल्यमापन होय .या पध्दतीत विद्यार्थ्याचे वर्तन व प्रगती यांचे गुणात्मक आणि संख्यात्मक चित्र पहावयास मिळते. मूल्यमापन=संख्यात्मक वर्णन + गुणात्मक वर्णन + शिक्षिकेचा अभिप्राय. (वा.ना.दांडेकर पृ.क्र.१४

विद्यार्थ्याने शैक्षणिक उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य केली आहेत. म्हणजेच त्याच्या वर्तनात किती परिवर्तन झाले हे पडताळून पाहणे म्हणजे मूल्यमापन होय. म्हणजे मूल्यमापनात उद्दिष्ट निश्चित करणे , अध्यापनानंतर ते साध्य झालीत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी योजना आखणे व त्या योजनेनुसार मूल्यमापन करणे या सर्व बाबीचा समावेश होतो.

मूल्यमापन हा शब्द व्यक्ती ऐवजी अमूर्त घटकांच्या किंवा गोष्टीच्या संदर्भात वापरला जातो.

उदा ः- अभ्यासक्रम .शिक्षणक्रम इत्यादी मुल्यनिर्धारणाच्या प्रक्रियेशी शिक्षक व मूल्यमापनाच्या प्रक्रियेशी संशोधक संबंधित असतो.

**१.३ ज्ञानरचनावाद**

ज्ञानरचनावादास ज्ञानमीमांसा करण्याची पध्दती संबोधले जाते.ज्ञानरचनावादाचे मूळ वेदकालीन कालखंड , सांख्यदर्शन .यासारख्या महाकाव्यात बौध्दकालीन कालखंडात पडलेले दिसून येते.विसाव्या शतकात आलेल्या नवीन शैक्षणिक प्रवाहांमध्ये शिक्षणतज्ञ आणि कार्यवादाचे जनक जॉन डयुई यांचा संबंध ज्ञानरचनावादाशी जोडला जातो.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अभ्यासक्रम व त्यानुसार पाठयपुस्तकामध्ये ज्ञानरचनावादाचा अवलंब केला आहे.ज्ञानरचनावाद हा ज्ञानाचा स्वरूपाचे स्पष्टीकरण देतो.व्यक्ती स्वतःच्या कल्पनेप्रमाणे नवीन ज्ञानाचा अर्थ लावतो.

गुड आणि ब्रॉफी यांनी बार्टलेट ( १९३२ यांना ज्ञानरचनावादी दृष्टीकोनाचा प्रवर्तक मानले जाते.ज्ञानरचनावादी सिध्दांतामध्ये अध्ययन म्हणजे बाहय जगताशी अर्थपूर्ण आंतरक्रिया साधून स्वतः ज्ञानाची रचना करण्याची प्रक्रिया होय. यामध्ये पूर्वज्ञानाच्या आधारे सक्रिय अनुभवाच्या साहाय्याने नवीन ज्ञानाची बांधणी करतात.

**२.संशोधनाची गरज**

शैक्षणिक मूल्यमापन विषयाचे अध्यापन करण्यासाठी ब-याचदा पारंपारिक अध्यापन पध्दती वापरली जाते.शैक्षणिक मूल्यमापन विषय विद्यार्थ्याना क्लिष्ट वाटतो.त्यामुळे सदर विषयासाठी अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी करण्यासाठी ज्ञानरचनाधारित अध्ययन अध्यापन कार्यनिती वापरली तर विद्यार्थ्यांच्या संपादनावर काय परिणाम होईल असा प्रश्न संशोधिकेस पडला.तसेच विद्यार्थ्याच्या ज्ञानरचनासंकल्पना निर्मितीस वाव मिळावा.एन्.सी.आर.टी.ने ( २००५ चा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला.यामध्ये अध्ययन अध्यापन प्रक्रियेत बदल सुचविले.म्हणून सदर विषय निवडला.

**३.संशोधनाचे महत्व**

सदर संशोधन शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी बी.एड्.स्तरावर आहे.पारंपारिक पध्दतीने अध्यापन करण्याकडे प्रत्येक शिक्षकाचा कल असतो.परंतु या अध्यापन पध्दतीमुळे विद्यार्थ्याची विचारक्षमता , शोधनक्षमता आकलनक्षमता फारशी विकसित होंताना दिसत नाही.म्हणून ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती महत्वाची आहे.

अ.विद्यार्थी

१.प्रत्येक विद्यार्थी ज्ञानरचनआधारित कार्यनिती समजून घेई ल.

२.अध्यापनाच्या नवीन पध्दतीमुळे अध्यापनात अभिरूची निर्माण होईल.

३.विद्यार्थ्याच्या कार्यशक्तीला चालना मिळते.

४.विद्यार्थ्याच्या सर्जनशीलतेस वाव मिळेल.

ब .शिक्षक

१.अध्यापनासाठी वेगळया अध्यापनाच्या पध्दती (ज्ञानरचनाआधारित यांचा वापर कसा करावा शिक्षकास समजेल.

२.शिक्षकांना विद्यार्थ्याच्या समस्या समजतील.

३.शिक्षकास विद्यार्थ्याच्या चांगल्या बाबी व त्रुटी समजतील.

**४.पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या**

**अ.संकल्पनात्मक व्याख्या —**

**१. शैक्षणिक मूल्यमापन —**

शैक्षणिक उद्दिष्टे कितपत साध्य झाली पाहण्यासाठी उपयोजिलेली सूत्रबध्द पध्दती म्हणजे शैक्षणिक मूल्यमापन होय.

२.ज्ञानरचना —

मुलांना जे माहित आहे किंवा ज्यावर विश्वास आहे त्याच्या आधारे नव्या माहितीचे आकलन करवून घेणे म्हणजे ज्ञानरचना .( लेव वायोगॉटस्की उपपत्ती

३.अध्ययन —

विद्यार्थ्याच्या वर्तनात हळूहळू घडून येणारा बदल.

४.अभ्यास —

अभि + आस = बसणे.या संस्कृत शब्दाचा अर्थ

भोवती बसून शिकणे असा होतो.

**५.संशोधनाची उद्दिष्टे**

१.शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी ज्ञानरचनावादी अध्ययनासाठी घटकांनुसार कार्यनिती निश्चित करणे.

२.शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी ज्ञानरचनावादी अध्ययन कार्यनितीचे विकसन करणे.

३.ज्ञानरचनावादी कार्यनितीची मूल्यमापन विषयासाठी वैधता तपासणे.

४.शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी ज्ञानरचनाआधारित अध्ययन अध्यापन कार्यनितीची परिणामकारकता अभ्यासणे.

**६.संशोधनाची गृहितके**

१.विद्यार्थी स्वतःची ज्ञाननिर्मिती स्वतः करत असतो.

२.शिक्षक विद्यार्थ्याच्या ज्ञाननिर्मितीस सहाय्य करू शकतात.

३.ज्ञानरचनावाद ही संकल्पना शिक्षकास माहिती असणे गरजेचे आहे.

**७.संशोधनाची परिकल्पना**

**अ.संशोधन परिकल्पना**

शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी ज्ञानरचनाआधारित अध्ययन अध्यापन कार्यनितीचा विद्यार्थ्याच्या संपादनावर सार्थ परिणाम होईल.

**ब.शून्य परिकल्पना**

शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी ज्ञानरचनाआधारित अध्ययन अध्यापन कार्यनितीचा विद्यार्थ्याच्या संपादनावर सार्थ परिणाम होणार नाही.

**८.संशोधनाची चले**

१. स्वाश्रयी चल

शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी पारंपारिक व ज्ञानरचनाआधारित कार्यनिती वापरून केलेले अध्यापन

**२.आश्रयी चल**

शैक्षणिक मूल्यमापन विषयातील घटकांच्या संदर्भात विद्यार्थ्याचे संपादन .

**९.संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनाव्दारे प्राप्त निष्कर्ष समान परिस्थिती असणा-या इतर बी.एड्. विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी लागू करता येतील.

**१०.संशोधनाची मर्यादा व परिमर्यादा**

**अ. मर्यादा**

१.प्रस्तुत संशोधन एस.आर.टी .विद्यापीठापुरता मर्यादीत राहील.

२.प्रस्तुत संशोधन बी.एड्.स्तरावरील शैक्षणिक मूल्यमापन विषयासाठी मर्यादीत आहे.

**ब. परिमर्यादा**

१.प्रस्तुत संशोधन ज्ञानरचनाआधारित कार्यनितीपैकी मुक्त प्रश्न, गटचर्चा, संगणक सहाय्यित कार्यनितीसाठी आहे.

२.प्रस्तुत संशोधन शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यासाठी मर्यादित आहे.

**११. संशोधनाची पद्धती :- (Research Method)**

प्रस्तुत संशोधन पुढील पद्धतीने करण्यात येईल.

१. प्रायोगिक पद्धतीने

**संशोधन अभिकल्प:-**

प्रस्तुत संशोधनासाठी समतुल्य गट अभिकल्पाचा उपयोग करण्यात येईल.अभिकल्पाची मांडणी खालील प्रमाणे असेल.

**१२. संशोधनाची साधने :- (Tools for Research)**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनाचे साधन प्रायोगिक पद्धतीसाठी संपादन कसोटीचा उपयोग करण्यात येईल.

**१३. संशोधनाचे न्यादर्श :- (Research Sample Size)**

नांदेड जिल्हयातील बी.एड् वर्गामध्ये शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या असेल.

**१४. न्यादर्श निवडीची पदधती:- (Sampling Design)**

प्रायोगिक पद्धतीसाठी नांदेड जिल्हयातील बी.एड वर्गात शिक्षण घेणा या १२० विद्यार्थी निवडण्यात येतील. प्रायोगिक पद्धतीसाठी असंभाव्यतावर आधारित सहेतुक व प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने केली.या अभिकल्पात यादृच्छीक निवड पद्धतीने दोन समान गट निवड पद्धतीने प्रस्तुत संशोधना करिता न्यादर्श निवडण्यात येईल.

**१५.सांख्यिकीय परिमाण:- (Statistical measure)**

प्रायोगिक पध्दतीसाठी मध्यमान, प्रमानविचलन, टि परिक्षीकेचा उपयोग करण्यात येईल.

## १६ . निष्कर्ष

१ स्तरावर नियंत्रित गटांतील विद्यार्थ्यापेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्याचे संपादन अधिक चांगले दिसून आले .

२ स्तरावर नियंत्रित गटातील विद्यार्थ्यापेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्याचे संपादन अधिक चांगले दिसून आले .

३ मुल्यमापन विषयासाठी ज्ञानरचनाआधारित अध्यापन कार्यनितीचा विद्यार्थ्याच्या संपादनावर सार्थ परिणाम होतो .

## संदर्भ ग्रंथ सुची :- (Bibliography)

१ . कदम चा . प . (१९८९ शैक्षणिक संख्याशास्त्र व मूल्यमापन . पुणे . नूतन प्रकाशन .

२ . कुलकर्णी ( १९९९ शैक्षणिक मानसशास्त्र पुणे . श्रीविद्या प्रकाशन .

३ . करंदीकर सुरेश ( २००७ शैक्षणिक मानसशास्त्र कोल्हापूर . फडके प्रकाशन .

४ . करंदीकर . सुमन देशपांडे . वसंत ( २०१३ मैत्री ज्ञानसरचनावादाशी पुणे . निराली प्रकाशन .

५ . जगताप ( २००६ शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र पुणे नित्यनूतन प्रकाशन .

# उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी विषयासाठी ज्ञानरचनावादी अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**अश्विनी भांडवले**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. यु.के.सदावर्ते**
मार्गदार्शक
(प्राचार्या.हुतात्मा जयवंतराव पाटील
महाविद्यालय हिमायतनगर जि.नांदेड

## १ . प्रास्ताविक :-

कोणत्याही शिक्षण संस्थेमध्ये अध्यापन हेच प्रमुख कार्य असते व या अध्यापन कार्याच्या परिणामकारकतेवरच शिक्षण संस्थांची प्रतिष्ठा यशस्विता व भवितव्य अवलंबून असते. ज्या शिक्षणसंस्थेमध्ये शिक्षक वर्ग चांगला आहे व जेथे अध्यापन कार्य चांगले चालते तिकडेच विद्यार्थ्यांचा पर्यायाने समाजाचा ओढा अधिक असतो हे सर्वज्ञान आहे. शिक्षण संस्थेमध्ये गुणवत्ता हा शिक्षण पध्दतीचा महत्वाचा घटक आहे.या मध्ये मुल्याचा विचार हा घटक महत्वाचा मानला गेला आहे.शिक्षणातील गुणवत्ता यामध्ये जीवनाच्या सर्वा गिण गुणवत्तेचा समावेश आहे.त्यामुळेच शांतता, पर्यावरण रक्षण , सामाजिक परिवर्तन हे गुणवत्तेचे गाभा घटक ठरले आहेत

हिंदी भाषा विषय हा सर्वस्पर्शी आहे.वरील गाभा घटकांचा अभ्यास करण्यास त्यामध्ये अधिक वाव आहे.हिंदी विषयाचा संबंध प्रत्यक्ष मानवी जीवनाशी येत असल्याने मानव जीवनाचे आंतर या सांस्कृतिक दर्शन , निरीक्षण, कार्य काराणभाव, कल्पनाशक्ती मानवी जीवनातील अनूभूती, मानवी जीवनातील घटनाचे पडसाद या सर्वाची दखल घेता येते.

शिक्षणाची ध्येय ही सामाजिक मुल्यावर भर देतात यामध्ये समानता, न्याय .स्वातत्र्य इतराचे स्वास्थ त्याच्या भावनाबददल संवेदनशीलता बाळगणे या गोष्टी साध्य करण्यासाठी वैयक्तिक व सामुहिक निर्णय प्रक्रियेची संधी पुरविणे आवश्यक आहे.यासाठी ज्ञानरचने प्रक्रियेवर भर देणे आवश्यक ठरते.

## २. संशोधन समस्येची गरज :- (Need of the Research)

बालकांचा सर्वागीण विकास हा शिक्षणातून होत असतो. वास्तविक मानवाच्या जीवनात जे काही अनुभव येतात त्याच्या वागणुकीमध्ये आचार विचारामध्ये जे परिवर्तन घडते जी सुधारणा होते यालाच शिक्षण असे म्हणतात.परंतु वर्गाध्यापनामध्ये अध्यापन हे पारंपारिक पध्दतीनेच केले जाते. शिक्षक हे वक्ते व विद्यार्थ्याच्या कल्पनाश्क्ती सर्ज नशीलतेला कोठेही वाव मिळत नाही त्यामुळेच विद्यार्थी कृतिशील ज्ञानार्थी बनण्यापेक्षा केवळ परीक्षार्थी आणि स्पर्धा र्थी बनताना दिसतात.

कामडी गोकुळ (२००७)यांच्या मते विद्यार्थ्याच्या अध्ययनातील त्रुटी दूर करण्यासाठी त्यांच्यात जिज्ञासा निर्माण करण्यासाठी नवीन कौशल्य प्राप्त होण्यासाठी शिक्षकांच्या अध्यापनातील त्रुटी दूर करण्यासाठी शिक्षकांना नवीन पद्धत वापरण्याची पद्धत मिळण्यासाठी शिक्षकांमध्येही विविध कौशल्य निर्माण होण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. ६

मानव हा निष्क्रिय ज्ञानप्राप्ती करणारा प्राणी नाही कारण मिळालेली माहिती तो जशीच्या तशी ग्रहण करत नाही तर स्वतःच्या अनुभवावर आधारित तिची नव्याने मांडणी करतो याचा अर्थ अध्ययन ही कृतिशील प्रक्रिया आहे.त्यासाठी विविध अध्ययन अनुभव पुरविणे आवश्यक आहे. त्यातुन आपण ही ज्ञाननिर्मिती करू शकतो ही विचारधारा विद्यार्थ्यामध्ये रूजवण्यासाठी परस्पर आंतरक्रियातून ज्ञाननिर्मिती करण्यात सहाय्य करण्यासाठी सामाजिक कौशल्याचा विकासासाठी व अध्यापन प्रक्रिया विद्यार्थी केंद्रित करण्यासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन कार्य क्रमाची निर्मिती करून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

वरील विवेचनावरून लक्षात येते की हिंदी विषय व ज्ञानरचनावाद या गोष्टी किती महत्वाच्या आहेत म्हणून हिंदी विषयात जर ज्ञानरचनावादच्या मदतीने अध्ययन व अध्यापन

केले तर विषयातील संकल्पना स्पष्ट होवून विद्यार्थ्यांची या विषयातील संपादन पातळी उंचवायला किती मदत होईल हे पाहण्यासाठी सदर संशोधन करणे गरजेचे आहे.

**३. संशोधन समस्येचे महत्व :- (Importance of Research)**

प्रस्तुत संशोधनाचे महत्व खालील प्रमाणे सांगता येईल.

१. सदर संशोधन केल्यामुळे विद्यार्थ्यांचे हिंदी विषयाच्या घटका बाबतचे संपादन वाढण्यास मदत होईल. म्हणून ते विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

२. हिंदी विषय शिकविणा या शिक्षकांना या संशोधनामुळे हे लक्षात येणार आहे की आपला हा विषय पारंपारिक पद्धतीपेक्षा ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दतीच्या सहाय्याने अधिक चांगल्या प्रकारे शिकविला जाऊ शकतो हे लक्षात आणून देण्याच्या दृष्टीने सदर संशोधन होणे महत्वाचे आहे.

३. शिक्षकांना या संशोधनाच्या माध्यमातुन हिंदी विषयाचे एक तयार ज्ञानरचनावादाने बनवलेले साधन मिळणार आहे. म्हणून संशोधिकेला प्रस्तुत विषयावर संशोधन होणे महत्वाचे वाटले.

अशा प्रकारे हिंदी विषयाचे व ज्ञानरचनावादाचे पर्या याने संशोधिकेने निवडलेल्या संशोधन विषयाचे महत्व आपल्या लक्षात येते.

वरील माहितीच्या आधारे आपणास असे सांगता येई ल की ज्ञानरचनावादाच्या मदतीने अध्यापन केले असता ते अधिक रूचिपूर्ण तर होतेच शिवाय ज्ञानरचनावादाच्या मदतीने अध्यापनामुळे गतीमंद असणा या विद्यार्थ्यांच्या विचारांना देखील चालना मिळू शकते. कोणताही विषय हा ज्ञानरचनावादाच्या मदतीने शिकविला जावू शकतो. व हिंदी विषयाचा महत्वाच्या घटकाचे माहिती ज्ञानरचनावादाच्या मदतीने अध्ययन केले तर त्याचा विद्यार्थ्यांच्या संपादनात किती फायदा होईल हे तपासण्यासाठी प्रस्तुत संशोधन होणे गरजेचे आहे असे संशोधिकेला वाटले म्हणून संशोधिकेने प्रस्तुत विषय हाती घेतला.

**४. समस्या विधान :- (Research Title)**

**उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी विषयासाठी ज्ञानरचनावादी अध्यापनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.**

**५.समस्या विधानातील शब्दांच्या व्याख्या:- (Operational definitions of important words in research title)**

**अ.संकल्पनात्मक व्याख्या**

**१.ज्ञानरचना —**

मुलांना जे माहित आहे किंवा ज्यावर विश्वास आहे त्याच्या आधारे नव्या माहितीचे आकलन करवून घेणे म्हणजे ज्ञानरचना . ( लेव वायोगॉटस्की उपपत्ती

**२. उच्च प्राथमिक स्तर :-**

इयत्ता ८ वी इयत्तेत १३ ते १५ या वयोगटातील शिक्षण घेणारे विद्यार्थी म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय.

**३.अध्ययन —**

विद्यार्थ्यांच्या वर्तनात हळूहळू घडून येणारा बदल.

**४.अभ्यास —**

अभि + आस = बसणे.या संस्कृत शब्दाचा अर्थ भोवती बसून शिकणे असा होतो.

**५.कार्यक्रम परिणामकारकता —**

अध्ययन अध्यापन करण्यासाठी विकसित केलेल्या पध्दतीचा परिणाम .

**ब. कार्यात्मक व्याख्या**

**१. ज्ञानरचनावाद ः—**

सामुहिक परिस्थितीत सहकार्याच्या भूमिकेतून सक्रीय अनुभव घेऊन अध्ययन अनुभवाची अर्थ लावणे म्हणजे ज्ञानरचनावद.

**२.उच्च प्राथमिक स्तर :-**

इयत्ता ८ वी इयत्तेत शिक्षण घेणारे विद्यार्थी म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय.

**३.ज्ञानरचनावादी अध्यापन कार्यक्रम :-**

सहकार्यात्मक व व्यक्तीगत प्रयत्नाना प्रोत्साहन देऊन ज्ञान निर्मिती करण्यासाठी सहकार्यात्मक कार्यनीतीचा वापर करून केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन म्हणजे ज्ञानरचनावादी अध्यापन कार्यक्रम होय.

**४.परिणामकारकता :-**

ज्ञानरचनावादी अध्यापन आणि पारंपारिक अध्यापन यामुळे विद्यार्थ्यांच्या हिंदी विषयामध्ये प्राप्त होणाऱ्या संपादन गुणाची तुलना म्हणजे परिणामकारकता होय.

**६. गृहीतके:- (Assumptions)**

१. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना हिंदी विषय अनिवार्य आहे.

२. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना घटक शिकताना समस्या येतात.

३. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना हिंदी विषयाचे पारंपारिक पद्धतीने अध्यापन केले जाते.

४. माध्यमिक शाळेत भाषा विषय हिंदी शिकण्यास विद्यार्थी कंटाळा करतात.

५. माध्यमिक शाळेत हिंदी विषया घटकाच्या अध्यापनात ज्ञानरचनानाव्दारे विद्यार्थ्यात अभिरूची निर्माण करता येवू शकेल.

६. माध्यमिक शाळेत हिंदी विषयाच्या घटकांचे अध्यापन करण्यासाठी ज्ञानाज्ञानरचनाना व्दारे कृती कार्यक्रमाची निर्मीती करता येवू शकते.

**७. संशोधनाची उद्दीष्टे :-**

१. माध्यमिक स्तरावर राट्रभाषा हिंदीच्या अध्यापनासाठी पारंपारिक पद्धतीची परिणामकारकतेचा अभ्यासणे.

२. माध्यमिक स्तरावर राट्रभाषा हिंदीच्या अध्यापनासाठी ज्ञानरचनावादी अध्यापनारूप कार्यक्रम विकसन करणे.

३. माध्यमिक स्तरावर राट्रभाषा हिंदीच्या अध्यापनात ज्ञानरचनावादी अध्यापन कार्यक्रम प्रत्यक्ष राबवून त्याची परिणामकारकता अभ्यासणे.

**८. संशोधनाची परिकल्पना:- (Hypothesis)**

१. **संशोधन परिकल्पना :-** माध्यमिक स्तरावर राट्रभाषा हिंदीच्या अध्यापनाची दैनंदिन जीवनाशी सांगड घालण्यासाठी ज्ञानरचनावाच्या आधारे तयार केलेला अध्यापन कार्यक्रम कथांच्या प्रभावी अध्यपनासाठी परिणामकारक ठरतो.

२. **शून्य परिकल्पना :-** ज्ञानरचनावादी अध्यापन कार्य क्रमामुळे मुलांच्या अध्यापनात सार्थ फरक पडत नाही.

**९. संशोधनाची व्याप्ती:- (Scope of the Research)**

१. प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्हयातील उच्च प्राथमिक शाळेत शिक्षण घेणा या सर्व विद्यार्थ्यांशी संबंधीत आहे.

२. प्रस्तुत संशोधन ज्ञानरचनावादाचा हिंदी विषयावर होणा या परिणामकारकतेच्या विषयाशी संबंधीत आहे.

३. प्रस्तुत संशोधनातुन निघणारे निष्कर्ष नांदेड जिल्हयातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना लागू पडतील.

४. प्रस्तुत संशोधन हिंदी विषयाशी संबंधीत आहे.

५. प्रस्तुत संशोधन हिंदी विषयातील अध्ययन व अध्यापनाशी संबंधीत आहे.

६. प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या हिंदी विषयाच्या अध्ययनाशी संबंधीत आहे.

**१०. संशोधनाची मर्यादा:- (Limitation of the Research)**

१. प्रस्तुत संशोधनासाठी हिंदी विषय या घटकाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रमाणित कार्यक्रम उपलब्ध नाही.

२. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील हिंदी विषयात ज्ञानरचनावादाची परिणामकारकता मोजण्यासाठी तयार केलेली कार्यक्रम शिक्षक निर्मीत असेल.

३. प्रस्तुत संशोधन हिंदी विषया पुरते असेल.

**संशोधनाची परिमर्यादा :-**
**(Delimitations of Research)**

१. प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्हयातील माध्यमिक शाळेपुरतेच मार्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन अनुदानीत मराठी माध्यम माध्यमिक स्तरातील इयत्ता ८ वी शिक्षण घेणा या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील ८ वी अभ्यासक्रमामधील हिंदी विषयातील फक्त घटकापुरतेच मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने तयार केलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मिळालेले गुण यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

५. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणीक वर्षे २०१३ - २०१७ या शैक्षणीक वर्षापुरते मर्यादित आहे.

**११. संशोधनाची पद्धती :- (Research Method)**

प्रस्तुत संशोधन मिश्र पद्धतीने करण्यात येईल.

१. मिश्र पद्धतीने [ सर्वेक्षण पद्धतीने व प्रायोगिक पद्धतीने)

**संशोधन अभिकल्प:-**

प्रस्तुत संशोधनासाठी समतुल्य गट अभिकल्पाचा उपयोग करण्यात येईल. अभिकल्पाची मांडणी खालील प्रमाणे असेल.

**१२.संशोधनाची साधने :- (Tools for Research)**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनाचे साधन सर्वे क्षण पध्दतीसाठी प्रश्नावली तर प्रायोगिक पद्धतीसाठी संपादन कसोटीचा उपयोग करण्यात येईल.

**१३. संशोधनाचे न्यादर्श :- (Research Sample Size)**

नांदेड जिल्हयातील माध्यमिक स्तरावरील हिंदी विषयाचे ८ वी वर्गामध्ये शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या असेल.

**१४. न्यादर्श निवडीची पद्धती :- (Sampling Design)**

प्रायोगिक पद्धतीसाठी नांदेड जिल्हयातील उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी विषय ८ वी च्या वर्गात शिक्षण घेणा या १२० विद्यार्थी निवडण्यात येतील. प्रायोगिक पद्धतीसाठी असंभाव्यतावर आधारित सहेतुक व प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने केली.या अभिकल्पात यादृच्छीक निवड पद्धतीने दोन समान गट निवड पद्धतीने प्रस्तुत संशोधना करिता न्यादर्श निवडण्यात येईल.

**१५.सांख्यिकीय परिमाण :- (Statistical measure)**

सर्वेक्षण पध्दतीसाठी शेकडेवारी.प्रायोगिक पध्दतीसाठी मध्यमान, प्रमानविचलन, टि परिक्षीकेचा उपयोग करण्यात येईल.

**१६. निष्कर्ष**

१ स्तरावर नियंत्रित गटांतील विद्यार्थ्यापेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्याचे संपादन अधिक चांगले दिसून आले.

२ स्तरावर नियंत्रित गटातील विद्यार्थ्यापेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्याचे संपादन अधिक चांगले दिसून आले.

३ हिंदी विषयासाठी ज्ञानरचनाआधारित अध्यापन कार्य नितीचा विद्यार्थ्याच्या संपादनावर सार्थ परिणाम होतो.

४ शिक्षिक विद्यार्थ्याच्या अध्ययन अध्यापनात अधिक सहभाग यावर भर देतात.

५ शिक्षक ज्ञानरचनाआधारित कार्यनितीचा अवलंब करतात.

**संदर्भ ग्रंथ सुची :-(Bibliography)**

१. चव्हाण, मुळे. (२०१३) शैक्षणीक संशोधन आराखडा (व्दितीय आवृत्ती)नाशिकः इनसाईट पब्लिकेशन

२.उमाठे, मुळे.(१९८७) शैक्षणीक संशोधनाची मुलतत्वे(व्दितीय आवृत्ती)नागपुरःमहाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ

३.विठठल मुरकुटे हिंदी शिक्षण .चतुर्थसत्त्करण. जयदीप प्रकाशन. नाशिक.

४.सुवर्ण पुरूषोत्तम देशपांडे (2013 असाही ज्ञानरचनावाद जीवनशिक्षण.

५.लोकभारती हिंदी आठवी कक्षा (2012 महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे ०४

६.दुनाखे प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान . नित्यनुतन प्रकाशन

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com